1) पुण्यनगरी पृ. पान क्र. १ दि. 04/02/2023

# दोन वर्षांत मीरा-भाईंदर, वसई-विरारमधील ८५ टक्के गुन्हे उघडकीस

## पोलिसांची चमकदार कामगिरी, नागरिकांकडून समाधान

**मीरा रोड** । मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय स्थापन होऊन दोन वर्ष पूर्ण झाली आहेत. पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्यानंतर पोलीस आयुक्तपदाचा पदभार मधुकर पांडे यांच्याकडे असून त्यांनी पदभार स्वीकारल्यापासून लोकांच्या समस्या दूर करणे व शहरातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्याला प्रथम प्राधान्य दिले आहे. त्यामुळे शहरातील गुन्हेगारीवर देखील आळा बसला असून आयुक्तालयातील उघड गुन्ह्यांचे प्रमाण ८५ टक्के झाले आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तलयाच्या अंतर्गत उत्तम कामगिरी करणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आयुक्तालयात प्रत्येक महिन्यात होणाऱ्या आढावा बैठकीत सन्मानित करण्यात येते. मीरा-भाईंदर, वसई-विरार शहरातील गुन्ह्याचा उत्कृष्ट तपास केल्यामुळे अनेक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात २०२१ या वर्षात खुनाचे ५२ गुन्हे दाखल होते, त्यापैकी ४७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. उघड केलेल्या गुह्यांचे प्रमाण ९० टक्के होते, तर २०२२ मध्ये खुनाचे ३८ गुन्हे दाखल असून ३८ गुन्हे उघडकीस आणले आहेत. हे १०० टक्के गुन्हे उघडकीस आणले आहेत. खून, विनयभंग, अपहरण, दुखापत, चेन चोरी व इतर जबरी चोरी यांचे २०२१ व २०२२ मधील दाखल गुन्हे व उघडकीस आणलेले गुन्हे याचे प्रमाण २०२२ या वर्षात जास्त आहे. २०२२ या वर्षअखेरपर्यंत आयुक्तलयाच्या हदीतील १६ पोलीस ठाण्यामध्ये उघडकीस आणलेल्या गुन्ह्यांचे प्रमाण ८५ टक्के आहे.

**२०२१ व २०२२ मधील दाखल गुन्हे व उघडकीस आणलेल्या गुन्ह्यांचे प्रमाण**

| वर्गवारी | दाखल | उघड | प्रमाण | दाखल | उघड | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| खून | ५२ | ४७ | ९० | ३८ | ३८ | १०० |
| विनयभंग | ४१४ | ४०२ | ९७ | ५४६ | ५२४ | ९६ |
| अपहरण | ४५१ | ९० | ६२१ | ५५२ | ८९ | ५०२ |
| दुखापत | ९४० | ९९ | १०५४ | १०३८ | ९८ | ९५२ |
| साखळी चोरी | ११३ | ६६ | ४१ | २३ | ५६ | ७५ |
| जबरी चोरी | २०२ | १४१ | ७० | २०१ | १४४ | ७२ |

2) पुढारी पान क्र. 5

# स्पा सेंटरमध्ये वेश्याव्यवसाय

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीतील ग्लोबल सिटी विरार येथे स्पा सेंटरमध्ये वेश्याव्यवसाय चालवत असल्याप्रकरणी अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांनी कारवाई करून दोघांना अटक केली आहे.

अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, नालासोपारा यांना माहिती मिळाली की, शितल नाइक, रा. एकता पार्क, विरार व साहिल ऊर्फ फैजान मोहम्मद खान हे दोघे साहिल स्पा सेंटर, ग्लोबल सिटी, विरार पश्चिम या स्पा सेंटरचे पार्टनर असुन ते दोघे जस्ट डायल वरुन ग्राहकांशी संपर्क करून त्यांना स्पामध्ये बोलावुन मसाजच्या नावाखाली काम करणाऱ्या मुलींकडून वेश्याव्यवसाय करवून घेतात व प्रत्येक गिऱ्हाईकाकडून वेश्याव्यवसायाच्या बदल्यात मोबदला घेतात. मिळालेल्या माहितीनुसार संतोष चौधरी, पोलीस निरिक्षक, अनैतीक मानवी वाहतुक कक्ष नालासोपारा यांनी पथकासह त्या ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी महिला आरोपी शितल नाइक व पुरुष आरोपी साहिल ऊर्फ फैजान मोहम्मद खान यांना रोख रकम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेउन एक पिडीत महिलेची वेश्याव्यवसायापासून सुटका करण्यात आली. याबाबत अर्नाळा पोलीस ठाण्यात भा.दं.वि.सं कलम ३७०, ३४ सह अव्या. प्रति. कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CS CamScanner

३) पुण्यनगरी पृ. पान क्र. १

दि. 04/02/2023

# अनैतिक संबंधाच्या संशयावरून पत्नीला संपवले

## मोबाईलच्या स्टेटसवरून खुनाचा उलगडा

**वसई :** विरारच्या कोपरी गावात एका महिलेच्या मृत्यूचे गूढ उकलले असून पतीनेच नवविवाहित पत्नीला गळा आवळून संपवले. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे. मात्र तिचा पती फरार आहे. खुनाचा उलगडा मोबाईलच्या स्टेटसवरून झाला आहे.



विरारच्या कोपरी गावातील शंकर पाडा जय जीवदानी अपार्टमेंट १०२ मध्ये पती वैभव पाटील व पत्नी प्रियांका पाटील हे दोघे राहत होते. १ फेब्रुवारीला प्रियांका वैभव पाटील या नवविवाहितेचा तिच्याच घरात कुजलेला मृतदेह आढळला. विरार पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जे.जे. रुग्णालयात पाठवला होता. या महिलेचा मृत्यू हा गळा आवळून झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी तपास केल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली. तिचा पती वैभव हा एका डेअरीत वाहनचालक म्हणून कामाला होता. मात्र त्याची नोकरी गेली होती. त्याची पत्नी एका ठिकाणी कामाला होती. तिथे तिचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून तिचा गळा आवळून खून केल्याची प्राथमिक माहिती पोलीस तपासात समोर आली. विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी दखल घेत तपास केला असता वैभव पाटील हा काही दिवसांपासून बेपत्ता होता. त्याने त्याच्या स्टेटस व आई-वडिलांनी मला माफ करावे, मी वेगळ पाऊल उचलण्यास जात आहे, असा मेसेज टाकला होता. खुनाच्या दिवशी वैभवचा मित्र संकित राऊत हा त्याच्यासोबत दारू पिण्यासाठी बसला होता. त्याला ताब्यात घेऊन अधिक चौकशीत ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी विरार पोलिसांनी मित्राला अटक केली असून फरार पतीचा शोध विरार पोलीस घेत आहेत.

४) लोकसत्ता पान क्र. 17

# गौण खनिजाच्या बेकायदा वाहतुकीला चाप

## मीरा-भाईंदरमध्ये गत वर्षात ३४ वाहनांवर कारवाई

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरातील विविध भागांत बेकायदा रेती उपसा करणाऱ्यांविरोधात अप्पर तहसीलदार कार्यलयाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. त्यात गतवर्षापासून आतापर्यंत रेती तसेच गौण खनिजाची बेकायदा वाहतूक करणाऱ्या ३४ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करून ३२ लाख रुपयांचा महसूल जमा केला आहे.

मीरा-भाईंदर शहर हे समुद्र व खाडीकिनारी वसले आहे. शासनाने केवळ घोडबंदर येथील रेती उत्खननावर अटीशर्तीनुसार परवानगी दिली आहे. मात्र शासनाकडे रॉयल्टी भरावी लागत असल्यामुळे अनेक रेतीमाफिया येथे सक्रिय झाल्याचे समोर आले आहे.



### एकाच दिवशी चार वाहनांवर बडगा

मीरा-भाईंदर शहरातून बेकायदा गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईसाठी अप्पर तहसीलदार नंदकिशोर देशमुख यांनी विशेष पथक तयार केले आहे. या पथकाने ३० जानेवारीला घोडबंदर येथील रेती बंदरावरून चार वेगवेगळ्या वाहनांवर कारवाई केल्याची माहिती अप्पर तहसीलदार कार्यालयातून देण्यात आली.

यात नवघर, चेना, इंद्रलोक, घोडबंदर आणि जेसल पार्क परिसराचा समावेश आहे. धक्कादायक म्हणजे हे माफिया शहरातील विविध खाडीकिनारी कांदळवनाची कत्तल करून रेती उपसा करत आहेत.

बेकायदा रेतीची वाहतूक केल्याप्रकरणी गतवर्षापासून आतापर्यंत एकूण ३४ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. यात वाहनमालकांवर दंडात्मक कारवाई करून ३७३ ब्रास रेती जप्त करण्यात आली आहे. तसेच या जप्त रेतीचा लिलाव करून सुमारे ३२ लाखांचा महसूल शासनदरबारी जमा करण्यात आला असल्याची माहिती मीरा-भाईंदर शहराचे अप्पर तहसीलदार नंदकिशोर देशमुख यांनी दिली.

CamScanner

दि. 04/02/2023

5) लोकसत्ता पान क्र. 17

# पारपत्रासाठी शाळा सोडल्याचा बोगस दाखला

## दोघांना अटक

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** पारपत्रासाठी शाळा सोडल्याचा बोगस दाखला बनविला जात असल्याचे प्रकरण तुळिंज पोलिसांनी उघडकीस आणले आहे. याप्रकरणी दाखला बनवून देणारा व घेणारा, अशा दोघांना अटक करण्यात आली आहे.

पारपत्रासाठी पोलिसांकडून चारित्र्य पडताळणी केली जाते. त्यासाठी पोलीस ठाण्यात पारपत्र विभागातून प्रकरणे दाखल होत असतात. तुळिंज पोलीस ठाण्यात पारपत्र पडताळणीसाठी नुकतेच प्रकरण दाखल झाले होते. त्यात १९९० साली शाळा सोडल्याचा दाखला होता. मात्र, तपासादरम्यान हा दाखला नुकताच बनवून घेतला असल्याचा संशय पोलिसांना आला. त्यानंतर तुळिंज पोलिसांनी ज्या शाळेतून हा दाखला दिला होता, तेथे चौकशी केली असता हा दाखला येथून दिला नसल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर अर्जदाराला बोलावून चौकशी केली असता हा दाखला नालासोपारा स्थानकाजवळील झेरॉक्स दुकानातून बनविला असल्याचे समजले. त्यामुळे हा दाखला बोगस असल्याचे उघड झाले आहे. त्यानंतर पोलिसांनी दाखला बनवून घेणारा व देणारा, अशा दोघांना अटक केली. अस्लम खान (४४) व शादाफ शेख (२५) अशी आरोपींची नावे आहेत.

याप्रकरणी गुन्हा दाखल करून बोगस दाखला बनवून देणारे दुकान सील केले आहे, अशी माहिती तुळिंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी दिली.

6) म. टा. पान क्र. 5

# मुंबई उडविण्याची पाकिस्तानातून धमकी

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

**एनआयएला आलेल्या मेलनंतर यंत्रणा सतर्क**

मुंबईला धमक्या येण्याचे सत्र काही थांबत नाही. राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) मुंबई कार्यालयाच्या अधिकृत ई-मेल आयडीवर एक मेल आला असून यामध्ये तालिबानी नेत्याचा हवाला देत मुंबईमध्ये हल्ला करणार असल्याचे म्हटले आहे. १५ दिवसांत हा धमकीचा दुसरा ई-मेल असल्याने देशातील सर्व यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्याच्या आधीच्या रात्री एनआयएच्या ई-मेल आयडीवर पहिला, तर दुसरा मेल गुरुवारी आला. एनआयएला आलेल्या मेलमध्ये मुंबईवर दहशतवादी हल्ला करण्यात येणार असल्याची धमकी देण्यात आली. तसेच, मेल करणाऱ्या व्यक्तीने तो स्वतः तालिबानी असल्याचा दावा केला आहे. तालिबान संघटनेचा प्रमुख नेता सिराजुद्दीन हक्कानी याने, हा आदेश दिला असल्याचेही यात म्हटले आहे. एनआयएच्या मुंबई कार्यालयाने याबाबतची माहिती दिल्लीतील मुख्यालयास दिल्यानंतर देशभरातील सर्व यंत्रणांना सतर्क करण्यात आले. मुंबईशी संबंधित मेल असल्याने एनआयएच्या अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती मुंबई पोलिसांना दिली.

पोलिसांनी धमकीची गंभीर दखल घेतली असून तपास सुरू केला आहे. प्राथमिकदृष्ट्या हा खोडसाळपणा दिसत असला, तरी तांत्रिक पुराव्यांच्या आधारे हा ई-मेल पाकिस्तानातून आल्याची माहिती सूत्रांनी दिली. मुंबई पोलिसांनी गुन्हे शाखेसह सर्वांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

CS CamScanner
CS CamScanner

दि. 04/02/2023

7) लोकसत्ता पान क्र. 15

## व्यावसायिकाच्या हत्येनंतर नालासोपाऱ्यात तणाव

**वसई :** सोमवारी नालासोपारा येथील मशिदीच्या ट्रस्टच्या वादातून झालेल्या हल्ल्यात जखमी झालेल्या बांधकाम व्यावसायिक मुस्सवीर मोहम्मद डायर ऊर्फ मुच्छु यांचा शुक्रवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. यामुळे सोपारा गावात तणाव पसरला होता. याप्रकरणी पोलिसांनी ५ आरोपींना अटक केली आहे.

नालासोपारा येथील टाकीपाड्यात असलेल्या सुन्नी गौसिया मशीद ट्रस्टच्या विश्वस्तांमध्ये काही दिवसांपासून वाद सुरू होता. सोमवारी रात्री आठच्या सुमारास रौफ अब्दुला शेख, बांधकाम व्यावसायिक मुस्सवीर मोहम्मद डायर ऊर्फ मुच्छु हे दोन सहकाऱ्यांसह या मशिदीत नमाज पडण्यासाठी गेले होते. बाहेर आल्यावर त्यांचा मोहम्मद इम्तियाज इस्माईल खान (३६), इम्रान युसूफ शेख (३३), अबरार खान (३८), अतारु खान (२८), इर्शाद खान ऊर्फ बंटी (४०) यांच्याशी वाद झाला. तुम्ही या मशिदीत यायचे नाही अशी दमदाटी यावेळी खान बंधूनी केली होती. त्यावर डायर यांनी जाब विचारल्यावर संतप्त इरशाद खानने चॉपरने मुस्सवीर मोहम्मद डायर ऊर्फ मुच्छु यांच्यावर वार केला होता. या हल्ल्यात डायर जखमी झाले होते. त्यांच्यावर मुंबईच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान शुक्रवारी त्यांचा मृत्यू झाला. अधिक तपास सुरू असल्याचे नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी सांगितले.

8) सामना पान क्र. 7

## भाईंदरमध्ये बांगलादेशी नागरिकाला अटक

भाईंदर, दि. ३ (सा.वा.) – नवघरच्या इंदिरानगर झोपडपट्टीत पासपोर्ट व व्हिसाशिवाय बेकायदा राहणाऱ्या एका बांगलादेशी नागरिकाला दहशतवादीविरोधी पथकाने अटक केली.

दहशतवादीविरोधी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक तुषार माळोदे यांना एक बांगलादेशी नागरिक इंदिरानगर झोपडपट्टीत बेकायदा राहत असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीनुसार माळोदे यांनी पथकासह त्या ठिकाणी सापळा रचून सोहेल मिया याला अटक केली. तो मूळचा बांगलादेशातील आहे. हिंदुस्थानात बेकायदा प्रवेश करून गेल्या दहा वर्षांपासून तो भाईंदर येथे राहत होता. मीरा-भाईंदर शहरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारी वाढली आहे. गुन्हेगारीवर वचक बसवण्यासाठी सर्वच पोलीसठाण्यांना सक्त आदेश देण्यात आले आहेत. नवघर पोलीस ठाण्यांतर्गत गुन्हेगारांची धरपकड सुरू असताना बांगलादेशी घुसखोराची माहिती मिळाली.

CS CamScanner

CS CamScanner

MHT
मुंबई
# हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, शनिवार 4 फरवरी 2023

संपादक विजय आर सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष-III, अंक-26 | पृष्ठ-8 | मूल्य ₹5/- | संरक्षक राजन पांडेय / तृप्ति आचार्य

विविएमसी ने 54 करोड़ 30 लाख रुपए वसूले
...पेज-3

'लड़की' के लुक में नजर आ रहे एक्टर
...पेज-6

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| माघ, शुक्ल पक्ष, चतुर्दशी | 7.12am 6.33pm | सुबह मौसम थोड़ी ठंड दिन में तापमान बढ़ने की संभावना | अधिकतम 32°C न्यूनतम 22°C | NSE OPEN 17,721.75 \| CLOSE 17,854.05<br>BSE OPEN 60,350.01 \| CLOSE 60,841.88 | GOLD 57,930 Per 10 Gm<br>SILVER 73,800 Per Kg |

# महिला की हत्या के आरोप में दोस्त गिरफ्तार
## व्हाट्सएप स्टेट्स के चलते हत्या का हुआ खुलासा
### नशे में दोस्त संग मिल की थी पत्नी की हत्या



विरार। विरार (पूर्व) के चंदनसार क्षेत्र में दिल दहला देने वाला घटना सामने आया है। इस घटना में पति ने पत्नी के चरित्र पर संदेह व्यक्त करते हुए शराब के नशे में पत्न ी की गला घोटकर हत्या कर दी। मृतक पत्नी का नाम प्रियंका पाटिल (27) है। पुलिस ने बताया कि, दोनों विरार (पूर्व) शंकरपाड़ा के रहने वाले हैं और दोनों की शादी डेढ़ वर्ष पहले ही हुई थी।

## दरवाजा तोड़ घर में घुसी पुलिस
## पति फरार



रोज की तरह पति वैभव बालाराम पाटील (27) बुधवार की रात अपने दोस्त के साथ दारू के नशे में पत्नी का गला घोंटकर हत्या कर सुबह फरार हो गया। दूसरे दिन सुबह रिश्तेदारों ने प्रियंका को कॉल किया लेकिन फोन का कोई जवाब नहीं मिला तो घरवालों ने जाकर घर पर दरवाजा खटखटाया, लेकिन प्रियंका ने नहीं दरवाजा नहीं खोला, जिसकी जानकारी स्थानीय पुलिस को दी गई को पुलिस ने मौके पर पहुंच दरवाजे को तोड़ घर में गए तो वहां उन्हें प्रियंका का शव पड़ा मिला। जिसे पुलिस ने पोस्टमार्ट के लिए ग्रामीण अस्पताल भेज दिया।

इस मामले में पुलिस ने पहले एडीआर के तहत मामला दर्ज किया।

## पोस्टमार्टम रिपोर्ट में हत्या का खुलासा

इसके बाद पुलिस ने मृतक प्रियंका के पति वैभव पाटील का मोबाइल स्टेट्स चेक किया जिसमें मोबाइल व्हाटसप स्टेट्स पर उसने लिखा था कि "सॉरी ममी पापा मुझे माफ करना मैं दूसरा काम करने जा रहा हूं" इसके जरिए पुलिस ने शव को दुबारा पोस्टमार्ट के लिए मुंबई के जेजे अस्पताल भेजा और इस मामले में पति वैभव के दोस्त को हिरासत में लिया है। जबकि पति फरार बताया जा रहा है जिसकी तलाश की जा रही है। पुलिस ने यह भी बताया कि पोस्टमार्टम के रिपोर्ट में गला घोटकर हत्या की जाने की जानकारी मिली है। जिसमें धारा 302 के तहत मामला दर्ज कर आगे की जांच की जा रही है।

CamScanner

# सरेआम ब्राउन शुगर बेचने वाला गिरफ्तार

विरार। विरार (पूर्व) परिसर बाजार रास्ते पर फोन कॉल पर ब्राउन शुगर की आपूर्ति करने वाले एक युवक को पुलिस ने गिरफ्तार कर लिया है। आरोपी के पास से पुलिस द्वारा बरामद किए गए ब्राउन शुगर का वजन लगभग 62 ग्राम है। जिसकी कीमत अंतरराष्ट्रीय बाजार में 2 लाख रुपये आंकी जा रही है। इस मामले में पुलिस ने आरोपी पर अनेक धाराओं के तहत मामला दर्ज कर लिया है। मिली जानकारी के अनुसार मीरा-भायंदर, वसई-विरार आयुक्तालय द्वारा उपायुक्त के आदेश पर विरार वरिष्ठ पुलिस निरीक्षक राजेंद्र कांबले के नेतृत्व में पुलिस सुनील पाटील को गुप्त सूचना मिली थी। जिसके तहत गुरुवार की रात चेकिंग के दौरान विरार बाजार के समीप तस्कर आरोपी सरफराज अब्दुल मजीद अहमद 24 वर्षीय ब्राउन शुगर के साथ गिरफ्तार किया गया। पुलिस ने बताया कि आरोपी अहमद नायगांव (पूर्व) का रहने वाला है और यह किसे बेचने आया थी, इस जानकारी के लिए पुलिस द्वारा पूछताछ की जा रही है।

CS CamScanner

लोकमत

# बांगलादेशी महिला, रूम मालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**नालासोपारा :** भारतात अनधिकृतपणे आलेल्या बांगलादेशी महिलेविरोधात तसेच तिला राहण्यासाठी जागा दिल्याप्रकरणी रूम मालकाविरोधात तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ओम नगर येथील साई आशीर्वाद बिल्डिंगमध्ये अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पोलिसांनी १ फेब्रुवारीला कारवाई करीत सुमन मंडळ (२८) या बांगलादेशी महिलेविरोधात भारतात अनधिकृतपणे वास्तव्य केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्या महिलेला राहण्यासाठी रूम दिल्याबद्दल तसेच पोलिसांना याबाबत माहिती न दिल्याबद्दल डब्बू नामक मालकाविरोधात गुरुवारी तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सुरू आहे.

Hello Vasai
Page No. 1 Feb 04, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

लोकमत

# ८ ते १० फेब्रुवारीला 'झील' महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विद्यावर्धिनी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाचा बहुप्रतीक्षित असा 'झील २०२३' येत्या ८, ९ आणि १० फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून 'झील' हा महाविद्यालयाचा अतिशय उत्साहात साजरा होणारा विविधरंगी वार्षिक सांस्कृतिक महोत्सव आहे. या महोत्सवाला विविध क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी प्रमुख अतिथी म्हणून आपली हजेरी लावली आहे.

यंदा कार्यक्रम अतिशय जल्लोषात साजरा करण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या 'स्टुडंट काऊन्सिल' या विद्यार्थी संघटनेकडून आयोजित केला जातो. नृत्य, गायन, वादन तसेच अनेक कलाविष्कार स्पर्धा आयोजित केल्या जातात. यात रांगोळी, चित्रकला, पाककला, नाट्यमय, पथनाट्य, ट्रेझर हंट अशा अनेकविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच 'प्री झील'अंतर्गत फॉर्मल्स डे, ट्रॅडिशनल डे असे डेज साजरे करण्यात येणार आहेत. ८ फेब्रुवारीला प्रमुख पाहुण्या, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या 'गोष्ट एका पैठणीची' चित्रपटाच्या नायिका सायली संजीव यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे.

Hello Vasai
Page No. 4 Feb 04, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner

लोकमत

# बनावट कागदपत्रे बनवणारी टोळी जेरबंद

## तुळिंज पोलिसांनी केली आरोपींना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पूर्वेकडील परिसरात बनावट कागदपत्रे बनविणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. ही टोळी प्रसिद्ध शाळांचे बनावट लिव्हिंग प्रमाणपत्र बनवून लोकांना पासपोर्ट बनवण्यासाठी विकायची. तुळिंज पोलिसांनी दोन आरोपींविरोधात ३१ जानेवारीला गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

नालासोपाऱ्याच्या रेहमतनगर येथील असराफ खान याने बनावट कागदपत्रांच्या आधारे पासपोर्टसाठी ऑनलाइन फॉर्म सादर केल्यावर ही बाब निदर्शनास आली आहे. त्यानंतर हे कागदपत्र पासपोर्ट विभागाकडून पडताळणीसाठी तुळींज पोलिस ठाण्यात पोहोचले. तेव्हा तुळींजच्या गोपनीय विभागाला त्या व्यक्तीच्या शाळेतील वास्तव्याचा दाखला संशयास्पद वाटला. शाळेच्या त्या प्रमाणपत्राची खात्री करण्यासाठी गोपनीय विभागातील पोलिसांनी शाळेशी संपर्क साधला असता, लिव्हिंग सर्टिफिकेट शाळेचे नसल्याचे समोर आले.

यानंतर पोलिस हवालदार विक्रम पन्हाळकर यांनी कागदपत्रे देणाऱ्या व्यक्तीला पोलिस ठाण्यात बोलावून त्याची कसून चौकशी केली असता ही कागदपत्रे बनावट असल्याचे समोर आले. त्यांनी नालासोपारा स्थानकाजवळील एका झेरॉक्सच्या दुकानातून एजंटकडून ती दोन हजार रुपयांना खरेदी केल्याची माहिती मिळाली. यानंतर पोलिसांनी एजंटच्या दुकानावर छापा टाकला.

### शिक्क्यांसह कागदपत्रे केली जप्त

पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात आणखी तीन शाळांचे बनावट प्रमाणपत्र मिळाले. दुकानातून प्रसिद्ध शाळांचे शिक्के, मुख्याध्यापकांच्या नावाचे शिक्के व इतर अनेक बनावट कागदपत्रेही जप्त केली आहेत. याप्रकरणी पोलिसांनी बनावट कागदपत्रे बनविणाऱ्या शादाब आणि बनावट कागदपत्रे सादर करणाऱ्या असराफ खानला अटक केली आहे.



CamScanner